## डॉ. सदानंद मोरे : ताराराणी विद्यापीठात क्रांतिवीर रंगरावदादा पाटील व्याख्यानमाला

# मराठ्यांनीच सर्वप्रथम राष्ट्रभावना जागविली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अखंड भारत ही संकल्पना घेऊन शौर्य गाजविणाऱ्या मराठ्यांनीच सर्वप्रथम राष्ट्रभावना जागृत केली. याच जोरावर त्यांनी अनेक लढायांत उत्तुंग पराक्रम गाजवीत आपला कायमचा ठसा उमटविला; पण दुर्दैवाने या कर्तृत्वाची दखल इतिहासकारांनी घेतली नाही, अशी खंत ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केली.

ताराराणी विद्यापीठाच्यावतीने क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्या ९९ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. 'महाराष्ट्राचे इतिहास लेखन' या विषयावर डॉ. मोरे यांनी बुधवारी विचारमंथन केले.




**कोल्हापुरात बुधवारी ताराराणी विद्यापीठाच्यावतीने आयोजित क्रांतिवीर रंगरावदादा पाटील व्याख्यानमालेत 'महाराष्ट्राचे इतिहास लेखन' या विषयावर ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. सदानंद मोरे यांनी विचार मांडले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, अशोकराव पर्वते, डॉ. एस. एन. पवार, डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.**

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.

डॉ. मोरे म्हणाले, मराठ्यांच्या इतिहासाकडे समग्रवृत्तीने पाहण्याची गरज आहे. पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील पराभवानंतर अब्दालीने थोरले माधवराव पेशव्यांना दूतामार्फत पत्र पाठवून आपले मराठ्यांशी वैर नसल्याचे सांगितले होते. याचवेळी रजपूतांनीही अब्दालीचा मुलगा तैमूरला मराठ्यांविरोधात लढण्यासाठी परत एकदा बोलावणे धाडले होते; पण तैमूर भारतात आला नाही, यावरून मराठ्यांच्या शौर्याची किती जरब होती, हे सिद्ध होते. पण, ब्रिटिशांसह स्थानिक इतिहासकार मराठ्यांचे हे शौर्य इतिहासबद्ध करण्यात कमी पडले, त्यामुळे मराठ्यांची प्रतिमा बदलली. त्यामुळेच मराठ्यांची राष्ट्राभिमानी आणि अखंड भारताची भूमिका ठळकपणे समोर येण्याची गरज आहे.

अध्यक्षस्थानावरुन डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, भारताचा तीन चतुर्थांश भूभाग जिंकूनही मराठे उपेक्षितच राहिले, त्यांना इतिहासकारांनी म्हणावे तसे स्थान दिले नाही. मराठ्यांचा हा जाज्वल्य इतिहास महाराष्ट्राबाहेर पोहोचविण्यासाठी नव्याने इतिहासाची मांडणी करण्याची गरज आहे. जातीय पद्धतीने लिहिलेला इतिहास बदलून त्याजागी खरा मराठा इतिहास लिहिण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

कार्यक्रमाची सुरुवात शाहीर आझाद नायकवडी यांच्या पोवाड्याने झाली. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुजय पाटील यांनी परिचय करून दिला. डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी सूत्रसंचालन केले. एस. डी. चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्य जे. बी. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. एस. एन. पवार उपस्थित होते.

२७/१२/१८ लोकमत